RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 May, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 15 May, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : अकरावा | मे २०१७

सन्तां दा करले संग मना (भजन) 4

राजघराण्याची कन्या (सत्संग) 5

आपण ध्यान-अभ्यास का करू नये? (प्रश्नोत्तरे) 17

ध्यान-अभ्यास (ध्यान-अभ्यासा विषयी संदेश) 29

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

सन्तांदा कर लै संग मना

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे रचलेले एक भक्तीभावात्मक भजन

सन्ता दा कर लै संग मना, चढ़ जाऐ नाम दा रंग मना
होमैं, नूं अंदरों, होमैं नूं अंदरों कढ़णा ऐं
आदत भैड़ी नूं छडणा ऐं,
सतगुरू दी शरणी, सतगुरू दी शरणी पैणा ऐं,
नाम जप के लाहा लैणा ऐं,

१. तैनूं मिलया मानस जामा ओऐ, तूं सांभ लवीं इंसाना ओऐ, (२)
लाहा लैण प्राणी, (२) आया ऐ, माया ने जाल पसाया ऐ,
सतगुरू दी शरणी...

२. कर बंदगी सोहणा बंदा ऐ, बंदगी दे बाजों गंदा ऐ, (२)
खाली ना जाऐ, (२) दम अड़या, ऐहे चम्म किसे नहीं कम अड़या,
सतगुरू दी शरणी...

३. सानूं नूरी दर्श दिखा दाता, साडी अक्ख दा पड़दा लाह दाता, (२)
बुरे सहण जुदाईयां, (२) दु:ख अड़या, सानूं तेरे दर्श दी भुख अड़या,
सतगुरू दी शरणी...

४. असीं जन्म-जन्म दे मैल भरे, उजले सतगुरू कृपाल करे, (२)
ओह तारण आया, (२) तारेगा 'अजायब' दे काज सवारेगा
सतगुरू दी शरणी...

राजघराण्याची कन्या

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू अमरदेवजी महाराजांची वाणी
रिबोला, इटली – २३ मे, १९८९

बंधू–भगिनींनो, आपल्यापुढे गुरू अमरदेवजी महाराजांची वाणी सादर केली जात आहे, सर्वांनी एकाग्रचित्ताने ऐका. आपण गुरूप्राप्तीसाठी खूप शोध घेतला. महाराज कृपाल सांगत असत,''जहाँ चाह वहाँ राह (इच्छा प्रबळ असेल तर मार्ग मिळतोच).'' ते हे देखील सांगत असत,''हा निसर्गाचा नियम आहे की भुकेलेल्यास भाकरी तसेच तहानलेल्यास पाणी जरूर मिळते.'' अखेरीस आपणांस गुरू अंगददेवजी प्राप्त झाले व आपण त्यांच्याकडून नामदानाची अमुल्य देणगी प्राप्त केली. सचखंडात पोहचल्यावर आपण आपला स्वानुभव गुरुग्रंथ साहेबमध्ये नमुद केला.

संत–महात्म्यांची वाणी अत्यंत आदरणीय असते. आपणांस माहीत नसते की संत–महात्म्यांच्या कोणत्या शब्दाने आपल्या जीवनाची कायापालट होईल. ज्याने खडीसाखर चाखलेली असते त्यास खडीसाखरेची चव किती मधुर आहे ते माहीत असते. जो खडीसाखरेच्या चवीचे केवळ ऐकीव वर्णन करतो तो आपणांस खडीसाखरेच्या मधुर चवीविषयी सविस्तर माहिती कशी बरे देऊ शकेल? त्याने सांगण्याचा जरी प्रयत्न केला तरी जो स्वत: चुकीच्या मार्गावर असेल तो इतरांनादेखील चुकीचा मार्गच दाखवेल. आपण प्रापंचिक लोक असा दावा करतो की आम्ही गुरूमत मार्गावर चालतो, नामाची कमाई करतो. परंतु सत्य हे आहे की गुरू लाभल्यानंतरच आणि नामदान प्राप्त झाल्यानंतरच आपल्या लक्षात येते की आपण त्यापूर्वी गुरुमतानुसार वाटचाल करीत होतो की आता गुरुमतानुसार वाटचाल करीत आहोत?

आपला आत्मा अजरामर शांतीच्या महासागराचा एक थेंब आहे, त्यास आपले मन आणि आपली बुद्धी समजू शकत नाही. आत्मा सुखाचा अमृतरस

सोडून अगोदर मनाच्या मंडळात उतरला. मनाच्या नादी लागून आत्म्याने अनेक दुष्कर्मं केली ज्यांचे रूपांतर त्यास जखडून ठेवणाऱ्या बेड्यांमध्ये झाले. मनाने आत्म्यास इंद्रीयभोगांमध्ये गुरफटविले. जस–जसा आपला आत्मा इंद्रीयभोगांमध्ये गुरफटत गेला त्याचा स्वयंप्रकाश मंदावत गेला. तो पापांच्या भाराखाली दबला गेला, इथपर्यंत की तो स्वत:चे मूळ–अस्तित्वदेखील विसरला की मी त्या शांतीच्या महासागराचा थेंब आहे, मी आपला स्वयंप्रकाश गमावून बसलो आहे. आत्मा हे देखील विसरला की मी अजरामर आहे.

आत्मा आपल्या मूळस्थानातून कारण मंडळात आला, तेव्हा त्याने कारण शरीर धारण केले त्यामुळे त्याचा स्वयंप्रकाश अंधुक झाला. त्यानंतर सूक्ष्म देशात उतरला तेव्हा तेथे महामायेची साथ घेऊन त्याचा स्वयंप्रकाश जास्तच मंदावला. नंतर जेव्हा तो स्थूल देशात आला तेथे त्याचा स्वयंप्रकाश नाहीसा झाला आणि तो मन–इंद्रीयांचा गुलाम बनला. येथे आपण प्रत्येक काम अज्ञानवशात अशाप्रकारे करतो जसे अंध मनुष्य उंच–सखल मार्गावर चालत असता जागोजागी ठेच खातो. आपणांस याची देखील जाणीव नसते की आपण जे काही करीत आहोत ते चांगले आहे का वाईट आहे?

महाराज सावन सिंहजी महाराज सांगत असत की आत्मा **राजघराण्याची कन्या** आहे. राजकुमाराशी लग्न करून चांगल्या राजमहालात रहाण्याऐवजी त्याने मनरूपी भंगीशी मैत्री केली व स्वत:स मलिन व कलुषित बनविले. मन इतके मलिन असूनही त्याची संतुष्टी होत नाही, ते सदैव इंद्रीयभोगांमागे धावत असते आणि आत्म्यास त्या विषय–विकारांचे ओझे उचलण्यास भाग पाडते. अशाप्रकारे आत्मा स्वत:स आणखी साखळदंडांच्या बेड्यांच्या बंधनात जखडून घेतो आणि स्वत:वर मळ घालून घेऊन स्वत:स कलुषित करतो.

आपण मन–इंद्रीयांच्या वशात जाऊन कर्मं करतो आणि त्या कर्मांची परतफेड करण्यासाठी आपणांस पुन्हा या संसारात जन्म घ्यावा लागतो. सर्वजण आप–आपल्या जागी दु:खांनी पीडित नजरेस पडतात, एकमेकांपासून

दु:खं लपवून ठेवलेली असतात परंतु सर्वच फोडात पू भरल्याप्रमाणे दु:खांनी भरलेले असतात.

संत–महात्मांनी मनुष्यजन्मास श्रेष्ठ योनींपेक्षा श्रेष्ठ, सर्व योनींमध्ये प्रमुख योनी म्हणून वर्णन केले आहे, तरीही मनुष्य सुखी नाही. आत्म्यास जेव्हा त्याहूनही खालच्या दर्जाच्या योनींमध्ये जावे लागते तेव्हा त्यास तेथे कसे सुख प्राप्त होऊ शकते? मनुष्याच्या भोजनासाठी रोज लाखो–करोडो पशू–पक्षांची कत्तल केली जाते. त्या तडफडणाऱ्या पशू–पक्षांचे प्राण घेतले जातात, त्यावेळी ते किती कष्ट भोगतात. कदाचित ते देखील एखाद्या पूर्वजन्मी चांगले शेठ–सावकार होऊन गेले असावेत. कशाप्रकारे त्यांना देखील आपल्या दुष्कर्मांची शिक्षा भोगावी लागते. शिकारी जनावरांची शिकार करताना त्यांस घायाळ करतात, ती जनावरे दु:खी होऊन कशी तडफडतात?

माशास गाळात फसवून बाहेर खेचून काढतात. त्यासदेखील आपला जीव प्रिय असतो, तो देखील आपला जीव वाचविण्यासाठी तडफडतो. आपण घायाळ जनावरांवरदेखील ओझे लादतो, त्यांना टांग्याला किंवा गाडीला जुंपतो. त्यांना उंच–सखल जागेतून आणि ओबड–धोबड रस्त्यावरून चालावे लागते. जेव्हा त्या जनावरांकडून ओझे खेचले जात नाही तेव्हा त्यांच्यावर वारंवार चाबूक मारला जातो.

प्रियजनहो, असे कोणते कोर्ट आहे जेथे जाऊन ते आपली तक्रार नोंदवू शकतात? आपल्या दुष्कर्मांची शिक्षा भोगण्यासाठी आपणांस आणखी निकृष्ट योनीमध्ये जावे लागते. आपणांस ते कष्ट यासाठी सहन करावे लागतात कारण आपण मनुष्यजन्माची कदर केली नाही. परमात्म्याने आपणांस जी मनुष्यजन्माची संधी दिली होती त्यास आपण निरर्थक इंद्रीय–भोगांमध्ये बेफिकीरपणे व्यर्थ गमावून निघून जातो.

कबीर साहेब सांगतात,''स्वत:चे प्राण सर्वांनाच प्रिय असतात. कत्तल होत असता सर्वांना एकसमान वेदना होतात, परंतु आपण जीभेच्या चवीसाठी इतर जीवांचे प्राण घेताना जरासुद्धा विचार करीत नाही.''

तुम्ही शांतचित्ताने विचार करून पहा! जर एखाद्या डॉक्टरने आपल्या भल्यासाठी छोटीशी इंजेक्शनची सुई उकळत्या पाण्यातून काढली तर आपला सहा फुटी देह थरथर कापू लागतो की आता आपल्याला किती दुखेल? विचार करा! आपणांस आपल्या फायद्यासाठी तयार केलेल्या सुईस पाहून किती भीती वाटते, तर त्या पशू-पक्षांना दु:खं-वेदना होत नसतील का? जर त्या दयाळू परमपित्याने आपल्यावर कृपादृष्टी करून स्वत: मनुष्यजन्म धारण करून आपणांस आपल्या खऱ्या घरी जाण्याची माहिती दिली नसती, नामदान दिले नसते तर हा कर्मं करण्याचा तसेच कर्मांची शिक्षा भोगण्याचा चक्रनेमीक्रम कधी संपलाच नसता.

सूर्य प्रकाशरूप असून तो सर्वांना प्रकाश देतो, परंतु भाग्यहीन घुबडास सूर्य दिसत नाही. घुबड एखाद्या काळोखी कपारीत, खाचीत वा झाडाच्या ढोलीत जाऊन आपला दिवस व्यतीत करते. सूर्य सकलजगास प्रकाश देतो, परंतु घुबडाच्या नशिबात सूर्यप्रकाश नसतो.

त्याचप्रमाणे संत सतगुरू सदैव संसारात येतात आणि उदार व करुणामय हृदयाने नामाच्या दौलतीचे दान देतात, परंतु आपण जीव इतके थोर भाग्य कोठून लिहून आणणार? आपल्या लक्षात ही गोष्ट येतच नाही की मुक्ती नामात आहे व आपण महात्म्यांकडून लाभ घ्यावा, उलट आपण महात्म्यांचा विरोध करण्यात आपले आयुष्य व्यतीत करून निघून जातो.

बंधूंनो, लक्षपूर्वक ऐका, गुरू अमरदेवजी महाराज या बाबतीत आपल्याला खूप प्रेमाने सविस्तर समजावत आहेत:

करम होवै सतगुरु मिलाए।। सेवा सुरत शबद चित लाए।।

आपण प्रेमाने समजावता की,''परमात्म्याने हा निर्णय आपल्या हातात ठेवलेला आहे की कोणत्या जीवाची आपल्याशी गाठ घालून द्यावी व कोणास या संसाराच्या चक्रनेमिक्रमात अडकवून ठेवावे. जेव्हा आपल्या

अनेक जन्मांमधील नेक कर्मांचा साठा तयार होतो तेव्हा प्रभू–परमेश्वर त्या चांगल्या कर्मांचे इनाम म्हणून आपणांस परिपूर्ण संत–सतगुरूंच्या शरणी आणतो. संत–सतगुरू आपल्यावर दया करतात व आपली सुरत शब्द–नामाशी जोडतात. जर प्रभू–परमात्म्याने आपल्यावर दया केली नसती तर आपल्या अंतरात नाम घेण्याची इच्छा उत्पन्नच झाली नसती.''

आपण दररोज जरी महात्म्यांकडे बसून राहिलो किंवा महात्मा आपल्या घरातच जरी जन्मले असले किंवा आपण जरी महात्म्यांच्या घरी जन्म घेतला तरीही आपण त्यांस ओळखू शकत नाही. इतिहास अशा प्रकारच्या उदाहरणांनी भरलेला आहे.

आज आपण गुरू नानकदेवजींची खूप अभिमानाने आठवण काढतो की आपण प्रभू–परमात्मारूप संसारात आलात व आपण अनेक आत्म्यांचा उद्धार केलात. आपल्याला लक्ष्मीदास आणि श्रीचंद नामक दोन मुलगे होते. लक्ष्मीदासाने तर आपल्या जीवनकाळातच शिकार करण्यास सुरुवात केली होती आणि श्रीचंदाने आपल्याकडून नाम घेतले नाही, अविनाशी मुनींना आपले गुरू धारण केले व त्यांच्याकडून दोन शब्दांचे नाम प्राप्त केले.

बाबा अमोलकदासांना श्रीचंदांकडून दोन शब्दांचे नाम प्राप्त झाले. बाबा बिशनदासजींना बाबा अमोलकदासांकडून दोन शब्दांचे नाम प्राप्त झाले. मला देखील बाबा बिशनदासांकडून दोन शब्दांचे नाम मिळाले. माझी बाबा अमोलक दासजींशी भेट झालेली आहे, मी त्यांना पिण्यासाठी दूध देखील तयार केलेले आहे. ते अत्यंत चांगले साधू होते, ते या संसारात १४० वर्षे राहीले.

लैहणाला (गुरू अंगददेव) त्याच्या कर्मांनी साथ दिली. लैहणाने लोकलाज सोडून गुरू नानकदेवजींना परमात्मारूप समजून त्यांची सेवा केली. लैहणाने गुरू नानकदेवजींच्या आज्ञेचे पालन केले. जेव्हा सेवकानेच सर्वकाही प्राप्त केले तेव्हा मुलांच्या मनात विरोध निर्माण झाला, इर्षा उत्पन्न झाली. श्रीचंदाने गुरू अंगददेवजींच्या बरोबरीने उदासी मताचा संप्रदाय चालू केला.

तुम्ही विचार करून पहा! गुरू नानकदेवजींचे आई–वडील त्यांस सदैव समजावत राहिले की काही–ना–काहीतरी करून यास समजावे. जर त्यांना हे माहीत असते की हेच खरे परमात्मारूप आहेत तर त्यांनी त्यांच्याकडून फायदा करून घेतला असता. गुरू नानकदेवजी आपल्या वाणीत लिहीतात:

भागहीन गुरु न मिले निकट बैठयां नित पास।

याचप्रमाणे महाराज सावन सिंहजी नोकरी करत असताना एक शिपाई काम करत असे. सावन सिंहजींना वाटले की त्याने बाबा जयमल सिंहजींकडून नाम घ्यावे परंतु त्याची नामदान प्राप्त करण्याची इच्छा नव्हती. महाराज सावन सिंहजींनी बाबा जयमल सिंहजींपुढे विनंती केली की आपण याच्यावर दया करा. बाबा जयमल सिंहजी म्हणाले,''याची कर्मं खूप कठोर आहेत. जरी याने कितीही जन्म घेतले तरी याच्या अंतरात नामदान घेण्याची इच्छा निर्माण होणार नाही.''

याचप्रमाणे महाराज सावन सिंहजी आपल्या एका किशन सिंह नामक मित्राची गोष्ट सांगत असत. किशन सिंह पाच ते सहा तास गुरुवाणीचे पठण करीत असे. महाराज सावन सिंहजींच्या हृदयात विचार उमलला की किशन सिंह अत्यंत पवित्र व नेक आहे, जर याने नाम घेतले तर तो खूप नामाची कमाई करेल व प्रभू–परमात्म्यास प्राप्त करेल. महाराज सावन सिंहजींनी बाबा जयमल सिंहजींना विनंती केली की मी माझा मित्र किशन सिंहास तुमच्याकडे पाठवेन. तो पाच ते सहा तास गुरुवाणीचा पाठ करतो. तुम्ही त्यास नाम द्या. बाबा जयमल सिंहजी खूप दयाळू होते. त्यांना प्रत्येकाच्या अंत:करणात काय आहे याची जाणीव होती. बाबा जयमल सिंह म्हणाले तू त्यास माझ्याकडे पाठवून दे.

किशन सिंह बाबा जयमल सिंहजींकडे आला आणि त्यांच्याकडे बसून त्याने चार–पाच तास स्वत:विषयीच गप्पा मारल्या. संत अतिशय दयाळू असतात. जर एखादा व्यक्ती काही गोष्टी सांगू लागला तर त्यास ते रोखत

नाहीत, ते त्या गोष्टी शांतपणे ऐकतात. परंतु जर एखादा व्यक्ती संतांच्या गोष्टी ऐकू इच्छित असेल तर त्यास त्या गोष्टी ते प्रेमाने सांगतात.

किशन सिंह पाच-सहा तासांनी परत निघून गेला. महाराज सावन सिंहजींनी बाबा जयमल सिंहजींकडे येऊन त्यांस विचारले की तुम्ही किशन सिंहास नामदान दिले का? बाबा जयमल सिंह म्हणाले,''याने पूर्वजन्मांत अत्यंत निकृष्ट आणि घोर कर्मं केलेली आहेत, तेव्हा हा नामाच्या मार्गावर येऊच शकत नाही. त्या कर्मांना अनुसरून हा जिवंत असता भाजून मरेल.'' महाराज सावन सिंहजी ही घटना सांगत असत की घराला आग लागून किशन सिंह त्या आगीत जळून मेला.

गुरू अमरदेवजी सांगत असत,''जर आपली उच्च प्रतीची कर्मं असतील तर आपली भेट सतगुरूंशी होते. गुरू आपली सुरत शब्दाशी जोडतात. जर आपले त्याहूनही थोर भाग्य असले तर आपण शब्द-नामाची कमाई करतो.''

हौमैं मार सदा सुख पाया माया मोह चुकावणिआं।।
हौं वारी जीओ वारी सतगुर कै बलिहारणिआं।।

आपण सांगता,''नामाची कमाई केल्याने हा फायदा झाला की आपल्या अंतरातील अहंकाराचा पडदा दूर सारला गेला. खरेतर अहंकारच आपल्या आणि परमात्म्याच्या दरम्यान असलेली अडथळारूपी भिंत आहे, जी नामच्या औषधाने नष्ट होते. नाम किती मौल्यवान वस्तू आहे हे मला आता समजले. माझे खरे घर सचखंड शांतीचा देश असून, तेथे पोहचून मला शांती लाभली. मी गुरू अंगददेवजींच्या चरणी स्वत:चे सर्वस्व अर्पण करतो, ज्यांनी मला नामाशी जोडले, मला नामदान दिले.''

गुरमत्ती परगास होआ जी अनदिन हरगुण गावणिआं।।

आपण सांगता,''आत्मा इंद्रियांच्या घाणीत लोळून आपल्या निजघरास तसेच आपल्या स्वयंप्रकाशास विसरून गेलेला आहे. जेव्हा आपल्या मनमतास

सोडून गुरुमत मार्गावर वाटचाल करू लागलो तेव्हा अंतर्यात तोच प्रकाश दिसला, अंतर्यात ज्योत प्रगट झाली.''

तन मन खोजे ता नाओं पाए।। धावत राखै ठाक रहाए।।

आपण नाम कसे प्राप्त करू शकतो? सर्वप्रथम तनाचा तपास करावा व नंतर मनाची चौकशी करावी. आपणांस ही युक्ती सतगुरूंकडून प्राप्त होते की आपण कशाप्रकारे आपल्या तनास विषय-विकारांच्या मळापासून नेक व पवित्र ठेवावे आणि कशाप्रकारे मनास वाईट विचारांपासून दूर करून संतांनी दिलेल्या नामस्मरणात गुंतवून पवित्र ठेवावे.

गुर की बाणी अनदिन गावै सहजे भगति करावणिआं।।
इस काया अंदर वस्त असंखा। गुरमुख साच मिलै ता वेखा।।
नौं दरवाजे दसवैं मुकता अनहद शबद वजावणिआं।।

आता गुरू अमरदेवजी महाराज सांगतात,''आपला देह केवळ हाडे, मांस व चामड्याचाच नसून परमेश्वराने त्यात अनेक वस्तू ठेवलेल्या आहेत आणि तो परमेश्वर स्वत:देखील या देहात बसलेला आहे. एखादा सच्चा गुरूमुख भेटला व त्याने आपणांस आपल्या देहाच्या अंतर्यात जाण्याचा मार्ग दर्शविला तर मी हे सर्व पाहू शकेन.''

आपल्या शरीरात नऊ द्वार आहेत. दोन नेत्रांची छिद्रे, दोन नाकांची छिद्रे, दोन कानांची छिद्रे, एक मुख आणि दोन खालच्या इंद्रीयांची छिद्रे आहेत. ही द्वारे बाह्यजगाच्या दिशेने उघडतात. परमेश्वराने दहावे द्वार गुप्त ठेवलेले आहे, ज्याच्या आत परमेश्वर वज्राचे द्वार बंद करून स्वत: बसलेला आहे. हे द्वार अंतर्याच्या दिशेने उघडते. परमात्म्याने संत-महात्म्यांना या द्वाराची नामरूपी चावी देऊन याजगात पाठविलेले आहे.

गुरू कुंजी पाहु निवल मन कोठा तन छत।
नानक गुरू बिन मन का ताक न उघड़े अवर न कुंजी हथ।।



गुरू रामदासजी महाराज सांगतात:

नौं दरवाजे धावत नवे दर फीके रस अमृत दसवें पीजे।

महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की,''आपला देह अमृताने भरलेला आहे, परंतु आपण त्या अमृताचा शोध बाह्यजगात घेतो आणि बहिरमुखी बनून जातो. गुरू नानकदेवजी सांगतात:

घर ही में अमृत भरपूर है मनमुखां साध न पाया।
ज्यों कस्तुरी मृग न जाने ओह भरम दा भरम भरमाया।।

आपण सांगता,''आपल्या विखुरलेल्या आत्म्यास नामस्मरणाद्वारे एकाग्र करून आपल्या दोन्ही नेत्रांमागे तिसऱ्या तिळावर आणा जेथे परमात्म्याचे द्वार आहे. तेथे रात्रंदिवस अनहद शब्दध्वनी निनादत आहे.''

सच्चा साहिब सच्ची नाई।। गुरपरसादी मंन वसाई।।
अनदिन सदा रहै रंग राता दर सच्चै सोजी पावणिआं।।

आपण सांगता,''तेथे सच्चे साहेब (गुरू परमेश्वर) आहेत, ते खरा न्याय करतात. तेथे पोहचून सहज अवस्था प्राप्त होते. परमात्म्याच्या खऱ्या द्वारी आत्मा शोभिवंत होतो.''

पाप पुंन की सार न जाणी।। दूजै लागी भरम भूलाणी।।
अग्यानी अंधा मग न जाणै फिर फिर आवण जावणिआं।।

मी अगोदरही सांगितले होते की आपण जी काही कर्मं करतो ती अज्ञानवशात करतो. ज्याप्रमाणे अंध व्यक्तीस उंच–सखल जागी चालता चालता पडून ठेच लागते, आपण जी काही चांगली–वाईट कर्मं करतो त्याची शिक्षा आपणांस भोगावी लागते, म्हणूनच आपण वारंवार जन्म घेतो आणि दु:खं भोगतो, पुन्हा कर्मं करतो आणि पुन्हा दु:ख भोगतो.

गुर सेवा ते सदा सुख पाया।। हौमैं मेरा ठाक रहाया।।
गुर साखी मिटया अंधिआरा बजर कपाट खुलावणिआं।।

आता आपण प्रेमाने सांगता,''ते जीव भाग्यवंत आहेत ज्यांना परिपूर्ण गुरूंची सेवा करण्याची संधी मिळते. सेवा केल्याने आपले तन, मन आणि धन पवित्र होते. आपल्या अंतर्यात जे वज्राचे द्वार बंद आहे ते उघडते आणि अंतर्यातील मार्ग एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडतो. तेव्हा आपल्या लक्षात येते की आपण कोणत्या मार्गाने जावे व कोणत्या मार्गाने जाऊ नये. जेव्हा आपण आपल्या मनमतानुसार चालण्याऐवजी गुरुमतानुसार वाटचाल करू लागतो तेव्हा आपल्या अज्ञानतेचा अंधार दूर होऊन आंतरिक ज्ञानाचा उजेड पसरतो.

हौमैं मार मंन वसाया।। गुर चरणी सदा चित लाया।।
गुर किरपा ते मन तन निरमल निरमल नाम ध्यावणिआं।।
जीवण मरणा सभ तुधै ताईं।। जिस बखसे तिस दे वड्याई।।
नानक नाम ध्याय सदा तूं जंमण मरण सवारणिआं।।

आता आपण सांगता,''जेव्हा आपण गुरूंनी केलेल्या उपदेशानुसार चालतो, नामाची कमाई करतो तेव्हा आपले तन आणि मन निर्मळ होते. नामाच्या कमाईने आपल्या अंतर्यातील मी–मोठेपणा व अहंकार दूर होतो.''

आपण शेवटी एक उपदेश करता की आपण नामाची कमाई करावी. आपण कोणत्याही इतर साधनाच्या आधारे यशस्वी होऊ शकत नाही, जन्म–मरणाच्या चक्रनेमिक्रमापासून तसेच सांसारिक दु:खांपासून आपला बचाव होत नाही. जर जन्म–मृत्युच्या दु:खांपासून स्वत:चा बचाव करून शांतीच्या देशात पोहचण्याची आपली इच्छा असेल तर आपण शब्द–नामाची कमाई करावी. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

शब्द विसारन तिन्हां ठौर न ठांव।। ओह भ्रमे भूले ज्यों सुन्ने अंदर कांव।।

स्वामीजी महाराज सांगतात :

वे क्यों आए इस जगत में जिन्हें मिली न पूँजी शब्द की।।
वडभागी ओह जीव है जो करे कमाई शब्द की।।

गुरू अमरदेवजी महाराजांनी अत्यंत प्रेमाने आपणांस आपला अनुभव समजावून सांगितला की जेव्हा परमेश्वर आपल्यावर दया करू इच्छितो तेव्हा तो आपली भेट गुरूंशी घडवून आणतो. जेव्हा गुरू आपल्यावर दयेचा वर्षाव करतात तेव्हा ते आपणांस शब्द–नामाशी जोडतात. शब्द–नामाची कमाई केल्याने आपल्या अंतरातील अज्ञानतेचा अंधार दूर होतो. तसेच मी–मोठेपणा व अहंकार आपली साथ सोडतात. आपण प्रभू–परमेश्वराच्या भक्तीत मग्न होतो व आपल्या तना–मनास पवित्र करतो. परमेश्वर अन्यायी नसून तो खरा न्याय करतो. जे परमेश्वराची भक्ती करतात, परमेश्वर त्यांना जरूर आपल्या घरी स्थान देतो.

जीवण मरणा सभ तुधै ताईं।। जिस बखसे तिस दे वड्याई।।
नानक नाम ध्याय सदा तूं जंमण मरण सवारणिआं।।

***

आपण ध्यान-अभ्यास का करू नये?

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान - ४ डिसेंबर, १९८१

एक प्रेमी : *एखाद्या नामधारी विवाहित जोडप्यास जर अपत्य नसेल तर त्यांनी अपत्य जन्मास घालण्याचे प्रयत्न करावेत का त्यापासून दूर रहावे?*

बाबाजी : ज्या शक्तीने या विश्वाची रचना रचलेली आहे त्याच शक्तीने विवाहानंतर अपत्य जन्मास घालण्याची इच्छादेखील निर्माण केलेली आहे. त्यामुळे अपत्यहीन विवाहीत जोडप्यास अपत्य प्राप्तीची इच्छा असणे स्वाभाविकच आहे.

अपत्यांना जन्म द्यावा वा देऊ नये या बाबतीत संत काहीच सांगत नाहीत. ते आपल्यावर अवलंबून असते. तुम्ही जर मुलांचे पालनपोषण योग्यरितीने करू शकत असाल, तर मुलांना जन्म द्यावा असे संत सांगतात. परंतु तुम्ही जर मुलांचे पालन-पोषण योग्यरितीने करू शकत नसाल, तर मुलांना जन्म न देणे हेच योग्य आहे. हे सर्वतोपरी पती-पत्नीच्या इच्छेवर अवलंबून असते.

७७ आर. बी. राजस्थान येथील आश्रमामध्ये एक अमेरिकेतील महिला मला भेटावयास आली. तिने मला विचारले की,''तिची जास्तीत जास्त मुलांना जन्म देण्याची इच्छा योग्य आहे की अयोग्य?'' मी तिला म्हणालो, ''या बाबतीत मी तुला काय सांगू शकतो? योग्य वेळ आल्यावर तुझ्या ते आपोआपच लक्षात येईल.''

पुढील वर्षी मी अमेरिकेस गेलो असता, ती स्त्री मला भेटावयास आली. तिला जुळी दोन मुले झालेली होती. ती मला म्हणाली, दोन मुलांना सांभाळतानाच माझ्या नाकी नऊ आलेली आहेत. जर प्रत्येकवेळी अशी जुळी मुले झाल्यास त्यांना सांभाळणे अतिशय अवघड होईल.

आपल्या अधिक मुले होण्याच्या केवळ इच्छेने जास्त मुले होत नाहीत. त्यामुळे जास्त मुलांचा विचार करण्याऐवजी आपण नामस्मरणाचा विचार करणे अधिक योग्य आहे. आपल्या कर्मांना अनुसरुन आपल्या नशिबात मुले होणे लिहिलेले असेल तर आपणांस मुले नक्कीच होतील, ज्यामुळे आपली कर्मं आणखीन एका आत्म्याशी जोडली जातील. आपण विवाहीत असून आपणांस मुले व्हावीत अशी इच्छा बाळगत असू आणि आपली पूर्वकर्मांनुसार मुले होणे आपल्या नशिबात असेल, तर मुले नक्कीच होतील.

अपेक्षा ठेवून जर आपण दान करत असू वा अपेक्षापूर्तीसाठी परमात्म्याची भक्ती आपण करत असू तर त्या इच्छापूर्तीसाठी आपणांस पुन्हा या जगात यावे लागते. त्यामुळे आपणांस संत नेहमी सांगतात की, अपेक्षा ठेवून दान करू नये तसेच एखादी इच्छा पूर्ण व्हावी म्हणून भक्ती करू नये. परमात्म्याची भक्ती आणि दान नेहमी नि:स्वार्थ वृत्तीने करावयास हवे.

महात्मा त्रिलोचन परमात्म्याची खूप भक्ती करीत असत. ते सांगत मृत्युसमयी जी इच्छा आपल्या अंत:करणात असते ती इच्छापूर्ती करण्यासाठी आपणांस पुन्हा या जगात यावे लागते. त्यामुळे आयुष्यभर तर आपण मुले जन्मास घालण्याबद्दल विचार करीत राहिलो तर मृत्युसमयीसुद्धा आपले लक्ष त्यागोष्टीकडेच असेल. त्यामुळे ती इच्छा पूर्ण होण्यासाठी आपणांस डुकराच्या योनीत जन्मास यावे लागेल. डुकरीण एक असे जनावर आहे जी बाळंत होताना अनेक पिल्लांना जन्मास घालते. मला या प्राण्याबद्दल सखोल ज्ञान नसल्याने, मी खात्रीपूर्वक सांगू शकत नाही. परंतु मी असे ऐकले आहे की डुकरीण एका वेळेस बारा पिल्लांना जन्म देते आणि वर्षातून तीन-चार वेळा ती बाळंत होते.

महात्मा त्रिलोचन असेही सांगतात की, जर कुणाला मृत्युसमयी या जगातील विषय-भोग भोगण्याची इच्छा झाली, तर त्यास वेश्येच्या जन्मास यावे लागते. मृत्युसमयी जर एखाद्या मनुष्याने कुणा परस्त्रीसोबत शारीरिक भोगाचा अपवित्र विचार मनात आणला असेल वा एखाद्या स्त्रीने आपल्या

पतीशी वा इतर पुरुषाशी शारीरिक संबंध ठेवण्याची इच्छा बाळगली असल्यास तिला पुढच्या जन्मात वेश्येचे शरीर धारण करावे लागते आणि तिने कितीही लोकांशी भोग विलास केला तरीही तिचे समाधान होत नाही.

जर कुणी मोठ-मोठ्या इमारतींची वा मोठमोठ्या घरांची काळजी करत मरण पावला, तर भुत बनून त्यास त्या घरांमध्ये राहवे लागते. जे लोक मृत्युसमयी या जगातील धनसंपत्तीचा विचार करीत असतात तसेच अधिक धनसंपत्तीचा संग्रह आपण करू शकलो नाही अशी खंत जे लोक बाळगतात, त्यांना सर्पाच्या योनीत जन्म घेऊन या जगात यावे लागते.

अखेरीस महात्मा त्रिलोचन सांगतात की, जे मृत्युसमयी परमपिता परमात्म्याची आठवण ठेवतात, ज्यांच्या अंतर्यात परमात्मा प्रगट झालेला असतो, ते स्वगृही म्हणजे सचखंडास जातात.

सर्व संत-महात्मे आपणांस अतिशय प्रेमाने समजावतात की, आपल्या जन्मापूर्वीच आपले प्रारब्ध कर्मं लिहिली जातात. आयुष्यात येणारी सुख-दु:खे, गरिबी-श्रीमंती, आजारपण-निरोगीपणा अगोदरपासूनच आपल्या नशिबामध्ये लिहिलेला असतो. ते भोगण्यासाठीच आपण या जगामध्ये येतो. या जीवनामध्ये आपणांस व्यापारात होणारा नफा-तोटा, समाजात मिळणारे मान-पान वा अपमान, आपणांस किती मुले होणार? हे सर्व अगोदरपासूनच आपल्या नशिबामध्ये लिहिलेले असते. जर आपण या विधीलिखित गोष्टी काहीही करून बदलू शकत नाही तर मग **आपण ध्यान अभ्यास का करू नये?** जेणेकरून जे काही आपणास मिळणार आहे ते आपण विनातक्रार भोगू शकू व आणखीन नवीन कर्मे बनवू नयेत. तुलसी साहेब सांगतात :

पहले बनी प्रालब्ध पाछे बना शरीर।
तुलसी दासा खेल अचरच है पर मन नहीं बंधदा धीर।।

आपण सांगता ही विश्वाची रचना अद्‌भुत आहे, परंतु आपले मन ते मान्य करण्यास तयार नसते.

एक प्रेमी : *आपल्या पूर्वकर्मांमुळेच जर आपण या जगात आलेलो आहोत, तर मग अजाणतेपणाने आपण वाईट कर्मं का करतो? काही लोकं सौभाग्यशाली असतात, ते आपल्यासारखे संत बनतात. असे का होते?*

बाबाजी : आपणांस मनुष्य जन्म आपल्या पूर्वकर्मांचे फळ भोगण्यासाठी मिळालेला असतो परंतु आपण या जन्मामध्ये आणखीन नवीन कर्मं करतो, त्यामुळे असे होते. प्रत्येक जन्मानंतर आपली अनेक कर्मांची पुंजी बाकी राहते, ज्याची परतफेड झालेली नसते. त्या कर्मांचे फळ भोगून त्यांची परतफेड करण्यासाठी आपणांस पुन्हा जगामध्ये यावे लागते.

संतांना कल्पना असते की, आत्मे अजाण आहेत, त्या अजाण अवस्थेत ते पुन्हा नवीन कर्मं बनवित आहेत. कमीत कमी आत्म्यांना याची कल्पना असते की, जे पेरते तेच उगवते. या नियमाची आपणांस माहिती आहे की, आपण मिरची पेरल्यास ऊस उगवत नाही. म्हणून संत आपणांस नेहमी सांगतात, ''कोणतेही कर्म करताना सावधानी बाळगा, कारण त्याची परतफेड तुम्हांस कराविच लागेल.''

संत महात्मे उच्च मंडळातून येतात. त्यांचे या जगातील व्यक्तींशी काही देणे-घेणे नसते. त्यांची स्वत:ची अशी कोणतीही कर्मं नसतात, ज्यांची परतफेड करण्यासाठी त्यांना शारीरिक दु:खं सोसावी लागावित. त्यांच्यावरही काही काळापुरता मायेचा पडदा असतो, परंतु योग्यवेळी थोड्याफार प्रयत्नांनी तो मायेचा पडदा दूर सरतो. त्यांच्यावर मायेचा काही परिणाम होत नाही.

गुरमुख ते मनमुख दा हो नहीं सकदा मेल।
वक्खो वक्ख दोहां दा रस्ता ज्यों पानी ते तेल।।
इक डोबे दूजा तारे ऐह है अजरज प्रभु दा खेल।
इक बाप दे दो बेटे एक पास ते दूजा फेल।।

पाणी आणि तेलाप्रमाणेच गुरूमुख आणि मनमुख एकत्र राहू शकत नाहीत, कारण दोघांचेही मार्ग निरनिराळे आहेत. दोघेही एकाच पित्याच्या मुलांप्रमाणे असूनही परिक्षेमध्ये एक पास होतो तर दुसरा नापास होतो.

संत आणि सत्संगी व्यक्तींचा परमात्मा एकच आहे. परमात्मा क्षणोक्षणी पाहत असल्याची जाणीव असल्याने संत कोणतेही वाईट कर्मं न करता, केवळ परमात्म्याचे गुणगान करीत असतात. परंतु सत्संगी परमात्म्याचे गुणगान करीत नाही. तो परमात्म्यास एखाद्या दहा वर्षाच्या मुलाइतकेदेखील समजत नाही ज्याच्यासमोर आपण कोणतेही दुष्कृत्य करण्यास घाबरतो. खरेतर परमात्मा त्यांनादेखील प्रत्येक क्षणी पहात असतो. तो वाईट कर्मं करताना मागेपुढे पाहत नाही.

मी प्रथमच बाबा बिशनदासजींकडे गेलो तेव्हा भोळेपणाने त्यांना विचारले, ''खरोखरच परमात्मा माझ्या अंतरामध्ये आहे का?'' त्यावेळी त्यांनी माझे नाव बदलले आणि मला म्हणाले, ''अजायब सिंह! तुझ्या अंतरामध्ये जो कुणी बोलत आहे, त्यास विचार की तू कोण आहेस?''

एक प्रेमी : *संतजी, सतगुरू जर याजगात येतानाच कर्ममुक्त असतात तर ते एवढा ध्यान-अभ्यास का करतात?*

बाबाजी : जगातील लोकांसमोर आदर्श ठेवण्यासाठीच संत असे करतात. त्यांनी स्वत:च जर ध्यान-अभ्यास केला नाही तर ते आपणांस ध्यान-अभ्यास करण्यासाठी कसे बरे सांगू शकतील? एखादा मनुष्य जे काम स्वत: करीत नाही, ते काम करण्यासाठी इतरांना तो कसे बरे सांगू शकेल? संत आपणांस नुसते बसून राहण्यासाठी सांगत नाहीत, तर ते आपणांस कठीण मेहनत करण्यास सांगतात, कारण मेहनतच सफलतेची गुरूकिल्ली आहे.

कबीर साहेब स्वत: परमसंत होते. या जगात अवतरणारे ते पहिले संत होते. जन्मत:च ते पूर्ण गुरू होते, तरीदेखील त्यांनी ध्यान-अभ्यास करत कडक मेहनत केली आणि गुरू धारण करण्याची प्रथा सुरू केली. त्यांनी रामानंदजींना स्वत:चे गुरू म्हणून धारण केले. नि:संशयपणे रामानंद पूर्ण गुरू नव्हते. वास्तविक पाहता कबीर साहेबांनीच त्यांना मुक्ती मिळवून दिली. गुरू-शिष्य परंपरा चालू राहण्यासाठी कबीर साहेबांनी रामानंदजींना गुरू म्हणून धारण केले.

तुम्ही कोणत्याही महात्म्यांचा इतिहास वाचून पाहा. सर्वांनी ध्यान-अभ्यास करण्यासाठी खूप मेहनत घेतली. गुरू नानकदेवजी महाराज अकरा वर्षे दगड-गोट्यांवर झोपत असत. स्वामीजी महाराजांनी सतरा-अठरा वर्षे एका लहानशा खोलीत बसून ध्यान-अभ्यास केला. याचप्रमाणे बाबा जयमल सिंहजी आणि आपले गुरू सावन सिंहजी व कृपाल सिंहजी महाराजांनीही ध्यान-अभ्यास करताना प्रचंड मेहनत केली.

एक प्रेमी : *संतजी, ज्या लोकांना नाम मिळालेले नाही तसेच इतर काही लोकं जे इतर पद्धतीने ध्यान-अभ्यास करतात, अशा लोकांबरोबर बसून नामधारी लोकं ध्यान-अभ्यास करू शकतात का?*

बाबाजी : ज्या लोकांना नाम प्राप्त झालेले नाही, अशा लोकांना कल्पना द्यावी की, तुम्ही ध्यान-अभ्यास करीत असून, त्यावेळी तुम्हाला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये. ध्यान-अभ्यास करताना जर कोणी

खोकत असेल वा इतर प्रकारचे आवाज काढून त्रास देत असेल तर अशाने तुमच्या ध्यानात अडचण निर्माण होऊ शकते, परंतु नाम न प्राप्त झालेली व्यक्ती तेथे शांत बसत असेल, तुम्हाला त्रास न देता स्वत:चा अभ्यास करीत असेल तर काही हरकत नाही.

एक प्रेमी : *संतजी, सतगुरूंच्या मदतीने ध्यान-अभ्यास करून आपण आपल्या कर्मांचे ओझे कमी करू शकतो का?*

बाबाजी : होय! आपली अनेक कर्मं ध्यान-अभ्यास केल्याने नष्ट होतात. त्यामुळे आपल्या आत्म्यास पूर्वकर्मांची परतफेड करण्याची शक्ती प्राप्त होते. अभ्यासी सत्संगी सुख आल्यावर उत्तेजितही होत नाहीत तसेच दु:ख आल्यावर ते उदासही होत नाहीत. कोणत्याही परिस्थितीत त्यांना स्वत:च्या सतगुरूंचा विसर पडत नाही. दु:ख आल्यावर अभ्यासी लोकं त्या क्षणांना सुखाच्या क्षणांपेक्षा श्रेष्ठ मानतात, कारण त्या क्षणांना तोंड दिल्याने त्यांची कर्मं कमी होत असतात.

अनेक सत्संगींच्या अंतिम समयी त्यांना भेटण्याची संधी मला लाभली आहे. ज्या सत्संगीने खूप ध्यान-अभ्यास केलेला आहे अशा सत्संगीस मृत्युसमयी विचारले की, तुला या जगातील एखादी वस्तु हवी आहे का? वा तुमची एखादी इच्छा अपूर्ण राहिली आहे का? तर तो उत्तर देतो, ''नाही.'' मृत्युसमयी त्यास कसलीही अडचण येणार नाही, त्यास कारण या जगातील कोणतीही वस्तू नको असते. त्यावेळी तो आनंद प्रदर्शित करतो, कारण त्यास कल्पना असते की तो स्वगृही परत जात आहे.

एक प्रेमी : *संतजी, गुरूंच्या इच्छेनुरूप कसे राहावे याबद्दल काही सांगाल का? जर मला एखादा निर्णय घ्यावयाचा असेल व मी आपले जीवन गुरूंच्या चरणी अर्पण केलेले असेल तर गुरू मला योग्य निर्णय घेण्यास भाग पाडतील कारण मी त्यांच्या इच्छेनुरुप वागत आहे. परंतु जेव्हा स्वत:च्या मर्जीनुरुप रहात असता मी घेतलेला निर्णय माझा स्वत:चा असेल का गुरूंचा असेल?*

बाबाजी : जो सत्संगी स्वत:स गुरूचरणी समर्पित करतो, तेव्हा त्याची स्वत:ची अशी कोणतीही मर्जी बाकी रहात नाही.

एक प्रेमी : *नामदानाच्या वेळी सतगुरू आपल्या अंतर्यामध्ये बसतात हे सत्संगीना माहिती असते. आम्ही सतगुरूंच्या दर्शनासाठी खूप दूरवरून आलेलो आहोत. त्यामुळे सतगुरूंच्या दर्शनांचा आमच्या आत्म्यावर काय परिणाम होईल?*

बाबाजी : बिचाऱ्या सत्संगींना सतगुरूंच्या शारीरिक स्वरूपातील दर्शनांच्या फायद्याची कल्पना नसते. सत्य हे आहे की, शारीरिक स्वरूपात असताना सतगुरू आपणांस केवळ ज्ञान देतात. देहस्वरूपामध्ये वावरत असताना ते आपणांस सांगतात की, मी याच रूपाने तुमच्या अंतर्यात बसलेलो आहे. अंतर्यात गेल्यानंतर तुम्हाला माझे हेच स्वरूप पाहावयास मिळेल. सतगुरू तर देहस्वरूपामध्ये नसतील तर अंतर्यात जाण्याचे ध्येय आपण समजूच शकणार नाही, ना आपण कधी अंतर्यात जाऊ शकू.

आपण स्वत: देहस्वरूपामध्ये कार्यरत असल्याने सतगुरूंनाही आपण देहस्वरूपात पाहू शकतो. आपण सुक्ष्म रूपामध्ये गेलो तर सतगुरूंचेही सुक्ष्म स्वरूप आपणांस दिसू लागेल. ब्रह्मस्थानामध्ये आपण पोहचल्यावर सतगुरू आपणांस शब्द स्वरूपात दिसतील. पारब्रह्मामध्ये आपण पोहचल्यावर सतगुरू आपणांस स्वच्छ आणि पवित्र शब्द स्वरूपात दिसतील. सचखंडामध्ये त्यांना आपण पूर्णपणे पवित्र प्रकाश स्वरूपात पाहू शकू. जेव्हा आपण सतगुरूंना आंतरिक स्वरूपात पाहतो, तेव्हा त्यांच्या देहस्वरूप दर्शनाचे महत्त्व आपल्या लक्षात येते की त्यांच्याशिवाय आपण अंतर्यामध्ये जाऊ शकत नाही व त्यांना निरनिराळ्या स्वरूपात पाहू शकत नाही. गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

मैं देख देख न रज्ञां गुरु सतगुरु देहा।

गुरू नानकदेवजींनी देह-त्याग केल्यानंतर गुरू अंगददेवजींनी संगतला मार्गदर्शन केले. गुरू अंगददेवजी सांगतात :

जिस प्यारे स्यों नेह तिस अग्गे मर चलिए। धृग जीवन संसार है ताँके पाछे जीवनां।।

हजरत बाहुंच्या गुरूंनी शरीर त्यागल्यानंतर हजरत बाहु त्यांच्या गुरूंच्या विरहामध्ये म्हणतात:

ऐह दु:ख हमेशा रहसी बाहु, मैं रोंदड़ी ही मर जाँवा हूँ।।

याचप्रमाणे बाबा जयमल सिंहजींनी देह-त्याग केल्यानंतर एके दिवशी महाराज सावन सिंहजी सत्संग करीत असतांना त्यांच्या सतगुरूंच्या आठवणीत खूप रडले. महाराज सावन सिंहजी त्यांच्या गुरूंच्या दर्शनांच्या बदल्यामध्ये सर्व काही त्यागण्यास तयार होते.

महाराज कृपाल सिंहजींचे गुरू बाबा सावन सिंहजींनी ऐहिक शरीर सोडल्यानंतर महाराज कृपाल त्यांच्या गुरूंच्या विरहाच्या दु:खात सर्व काही सोडून ऋषिकेशच्या जंगलामध्ये निघून गेले.

याचप्रमाणे महाराज कृपालजींनी त्यांच्या शरीराचा त्याग केल्यानंतर, माझी जी काही अवस्था झाली होती, तिचे वर्णन मी करू शकत नाही. तुम्हा सर्वांना कल्पना आहेच की माझी अवस्था कशी झाली होती? सर्व काही त्यागून फाटक्या कपड्यांमध्ये एखाद्या वेड्याप्रमाणे मी इथे-तिथे भटकत राहिलो. पाठीजींनी माझा शोध घेऊन मला ७७ आर बी. येथे घेऊन आले. त्यावेळी पाठीजींना मी अट घातली की कोणीही पूर्वेकडील वा पश्चिमेकडील व्यक्ती येऊन मला त्रास देणार नसेल तरच मी येथे राहीन. गावकऱ्यांना मी दिवसातून एक तासच भेटीन.

मला संसाराविषयीचे ज्ञान नव्हते. मला दिल्ली शहराविषयीदेखील काहीच माहिती नव्हती व मी तेथे कोणास ओळखतही नव्हतो. दिल्लीतील पप्पु व त्याच्या कुटुंबासदेखील मी ओळखत नव्हतो. पश्चिमेकडील कोणत्याही प्रेमींना मी ओळखत नव्हतो, कारण महाराज कृपालजींनी बाह्यजगाकडे पाहणारे माझे नेत्र बंद करवून त्यांनी माझे आंतरिक नेत्र उघडले होते. गुहेमध्ये बसून बराच काळ मी व्यतीत केला.

तुमच्या कोलंबिया देशातील डॉक्टर मौलिनो खूप ध्यान-अभ्यास करणारे आहेत, जे येथेच बसलेले आहेत. तुम्ही त्यांना प्रेमाने विचारू शकता की, माझ्याबद्दल त्यांनी कधी ऐकले होते का? बाह्यस्वरूपामध्ये ते मला ओळखत होते का? त्यांनी मला कधी दिल्ली वा इतरत्र कोठे पाहिले होते का? रसल पर्किन्स मला येऊन भेटला, केवळ तोच जाणतो की त्यास भेटून मला किती आनंद वा किती दु:ख झाले होते?

या बाह्य जगामध्ये मी येऊ इच्छित नव्हतो, कारण मला वाटत होते की, माझ्या गुरूंनी देहत्याग केल्यानंतर माझ्याकडे काय उरले आहे! आता मला आपल्या मांडीवर कोण बसवेल? कोण माझ्या डोक्यावर हात ठेवणार? आणि कोण मला खाऊ घालणार?

एकदा माझ्या गुरूंनी परमात्म्यास पाहण्यासाठी जेव्हा लोकांना आपले नेत्र बंद करण्यास सांगितले तेव्हा मी माझे नेत्र बंद केले नाहीत. एका प्रेमीने महाराजजींकडे मी नेत्र बंद केले नाहीत अशी तक्रार केली. महाराजजींनी त्याबद्दल मला विचारले असता, मी त्यांना म्हणालो,''माझ्यासमोर साक्षात सहा फूट उंच, चालता-फिरता परमात्मा मला दिसत असताना, मी माझे नेत्र का बरे बंद करू?''

तुम्ही खूप पैसे खर्च करून दुरचा प्रवास करून येऊ शकता व मला तुम्ही देहस्वरूपात पाहू शकता. परंतु मी भले कितीही पैसे खर्च केले, कितीही दूरवरचा प्रवास केला तरीही मी माझ्या परमात्मा कृपालना पाहू शकत नाही. हेच दु:खं मला रात्रंदिवस व्याकूळ करते. परंतु याचा अर्थ असा नाही की महाराज कृपाल माझ्यापासून दूर आहेत. ते माझ्या अंतर्यात असून, माझे प्रत्येक गाऱ्हाणे ते ऐकत आहेत. मला जे काही हवे ते सर्वकाही मला देत आहेत. परंतु त्यांना चालता-फिरतांना आणि बोलत असताना मी पाहू शकत नाही, त्यांच्या मांडीवर बसू शकत नाही आणि ते देहरूपात असताना जे काही करू शकत होतो, ते आता मी करू शकत नाही.

१३ ऑक्टोबर रोजी माझा खूप मोठा अपघात झाला होता, ज्यामध्ये आमची काहीच चूक नव्हती. आम्ही आमच्या मार्गी डाव्या बाजूने गाडी चालवत होतो आणि समोरून येणाऱ्या इतर वाहनांसाठी आम्ही १५ फूट रस्ता मोकळा सोडलेला होता. परंतु काही शेतकऱ्यांनी त्यांचा ट्रॅक्टर आमच्या गाडीवर आदळला. कोणासही दुखापत झाली नाही. मी बेशुद्ध झालो होतो. परंतु शुद्धीवर आल्यावर माझे हृदय विदीर्ण झाले व मला खूप दु:ख झाले. जगाकडे पाहून माझ्या हृदयात विचार येतो की, महाराज कृपालजी मला त्यांच्यासोबत आंतरिक मंडळांमध्ये का ठेवत नाहीत? या जगामध्ये त्यांनी मला का परत पाठविले?

तुम्ही भाग्यशाली आहात की खूप पैसे खर्च करून, दूरचा प्रवास करून तुमच्या गुरूंचे दर्शन तुम्हाला प्राप्त होते. परंतु माझ्यासारख्या दुर्भाग्यवंतास आपल्या गुरूंच्या दर्शनांची संधी लाभत नाही. ते या जगामध्ये असताना मला कसलीच चिंता नव्हती. आता मला खूप चिंता सतावतात. मी त्यांना देहस्वरूपात पाहू शकत नाही.

मित्रांनो! तुम्ही मला माझ्या दु:खं-वेदना आणि जखमांबद्दल काही विचारू नका. कृपालजींनी मला विरहाच्या वेदना दिल्या आहेत आणि मला रडत असलेल्या अवस्थेमध्ये सोडून ते निघून गेले आहेत.

जे आत्मा ध्यान-अभ्यास करतात, अंतर्यामध्ये जातात, त्यांना सतगुरूंच्या देह-स्वरूपातील दर्शनाच्या फायद्यांची कल्पना आहे. सतगुरू दर्शनांचा लाभ काय होतो, याची त्यांना कल्पना आहे. आपण सांसारिक लोक सतगुरूंच्या दर्शनांची महानता जाणत नाही.

***



ध्यान-अभ्यास

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान-अभ्यासात बसविण्यापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश, संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान - २६ ऑगस्ट, १९८५

बंधूनो! रोजच्याप्रमाणे शांत मनाने ध्यान-अभ्यास करा, कारण शांत मनच ध्यान-अभ्यास करू शकते. ध्यान-अभ्यास करताना बाहेरील कोणत्याही प्रकारच्या आवाजांकडे लक्ष देऊ नका. ज्या कामासाठी तुम्ही बसलेला आहात, त्याच कामावर तुमचे लक्ष केंद्रित करा. मनास इतरत्र भरकटू न देता, त्यास आपल्या तिसऱ्या तिळावर एकाग्र करा.

सत्संगीला नामस्मरणाच्या महानतेची जाणीव नाही की त्यामध्ये किती ताकद आहे आणि ते करणे आपल्यासाठी किती गरजेचे आहे? काल सत्संगामध्ये मी तुम्हांस सांगितले होते की, या जगाचे स्मरणच आपणांस पुन्हा या जगामध्ये घेऊन येते. सांसारिक लोकांची सर्व कामे पूर्ण होत नाहीत. त्यांची जी कामे अर्धवट राहिलेली असतात, त्या कामांचे विचार अंतिम समयी त्यांच्या मनात सतत येत असतात. त्या कामपूर्तीच्या आशेपोटी जीवास पुन्हा या जगामध्ये यावे लागते. आपल्यामध्ये असलेल्या या कमजोरीचा फायदा उचलत संत आपणांस समजावतात की, एका गोष्टीचे स्मरणच दुसऱ्या गोष्टीच्या स्मरणास दूर करू शकते, एका गोष्टीचे ध्यानच दुसऱ्या गोष्टीवरील ध्यानास बाजूस सारू शकते.

नियम असा आहे की, त्याची आपण आठवण काढतो, ज्याने दिलेल्या नामाचे स्मरण आपण करतो, त्यांचे स्वरूप आपोआपच आपल्या अंतरात पसरण्यास सुरुवात होते. आपण जर जगातील कामांचे स्मरण करण्यास सुरुवात केली, तर जगाची रूपे आपोआपच आपल्यासमोर उभी ठाकू लागतात. शेवटी जेथे आपली आशा गुंतलेली असते, आपल्या अंतिम समयी तेच विचार त्याच आठवणी आपल्या अंतरात उभ्या राहतात आणि

त्यांच्या ओघात आपण वाहून जातो. पुढे जाऊन त्याच रूपामध्ये आपणांस जन्म घ्यावा लागतो. महाराज सावन सिंहजी सांगत असत. ''जीव काही खूप दूर जाऊन जन्म घेत नाही. ज्या घराबद्दल त्यास प्रेम असते ज्या घरामध्ये तो वडीलधारा असतो, त्याच घरामध्ये तो लहान बाळाच्या वा प्राण्याच्या रुपात जन्मास येतो. दूरात दूर म्हणजे तो त्यांच्या शेजारच्या घरामध्ये जन्मास येतो.''

महात्मा आपणांस ठासून सांगतात की तुम्ही नामस्मरण करण्यावर जास्त भर द्या, परंतु नामस्मरण करण्याऐवजी आपण शब्द ऐकण्यावर जास्त लक्ष देतो. परंतु आपला आत्मा बाह्य जगामध्ये विखुरलेला असल्याने, तो शब्दाच्या आकर्षण क्षेत्रामध्ये येत नाही व त्यामुळे साधारणत: शब्द आपणांस आकर्षित करत नाही. चुंबकाच्या चुंबकीय क्षेत्रामध्ये जोपर्यंत लोखंड येत नाही, तोपर्यंत चुंबक त्यास खेचून घेऊ शकत नाही. नामस्मरणाच्या मदतीने आत्म्यास तिसऱ्या तिळावर एकाग्र करणे आपले कर्तव्य आहे. मग त्यास खेचून शब्द पुढे घेऊन जाईल. स्वामीजी महाराज सांगतात :

खींचे सुरत गुरू बलवान।

नामस्मरण करणे आपले काम आहे. आपली सुरत पुढे नेणे सतगुरूंचे काम आहे. शब्दाची निर्मिती सचखंडामध्ये होऊन तो आपल्या कपाळाच्या मागील बाजूस, आतमध्ये निनादत आहे. तुम्ही स्वबळाने सुरतला स्वत: खेचू शकत नाही. तुम्ही नामस्मरणाद्वारे शरीराची नऊ द्वारे आणि सहा चक्रे यांमधील आपले लक्ष काढून दोन्ही नेत्रांच्या मागील बाजूस मध्यभागी आपले लक्ष केंद्रित करा. तेथे शब्द गुंजन करीत आहे. या स्थानी पोहचण्याचे कर्तव्य शिष्याचे असते, त्यापुढे नेण्याची जबाबदारी सतगुरूंची आहे. आपण तेथे पोहचण्यापूर्वीच सतगुरू तेथे उपस्थित असतात.

तेथून वर जाण्याचे दोन मार्ग आहेत. एक डाव्या बाजूने जातो तर दुसरा उजव्या बाजूने जातो. डाव्या बाजूच्या मार्गामध्ये काळ बसलेला असतो. तो वाट पाहत असतो की, कधी आपला आत्मा त्या बाजूने जातो, जेणे करून तो आत्म्यास ताब्यात घेऊ शकेल. उजव्या बाजूच्या मार्गामध्ये आपली वाट पाहत सतगुरू बसलेले असतात, जेणेकरून आपण त्यामार्गाने गेल्यानंतर आपल्या आत्म्याचा सांभाळ ते करू शकतील. अंतरामध्ये सतगुरू उपस्थित नसतील तर कोणता शब्द पकडावा? कोणत्या मार्गाने जावे? वा आपणास कोठे जायचे आहे? याचा निर्णय आत्मा घेऊ शकत नाही. अंतर्यात खूप गुंतागुंत आहे. बाहेर जगामध्ये फिरताना जर कुणी आपणांस मार्गदर्शन केले नाही तर आपणांस ठिकठिकाणी थांबून मार्ग विचारावा लागतो. परंतु आपणांस मार्गाची पूर्णपणे माहिती असेल की अमुक मार्ग थेट दिल्लीस जातो, तर विना खंड आपण आपली कार वेगात नेतो, त्यामुळे आपला वेळ वाया जात नाही. गुरू नानकदेवजी सांगतात:

अंतर शब्द सुरत धुन जागे सतगुरू झगड़ नबेड़े।

आपला आत्मा जेव्हा जागृत होतो, आपल्या अंतर्यात शब्द प्रगट होतो, तेव्हा सतगुरू निर्णय घेऊन आपणांस सांगतात की, मुला! या शब्दास पकड. ही बाजू माझी आहे. दुसऱ्या बाजूस जाऊ नको, कारण ती बाजू

काळाची आहे. नाम देते वेळी सत्संगींना पाच पवित्र शब्द–नाम सांगितले जाते. ते अत्यंत उच्चस्थराचे आहेत. ध्यान–अभ्यास करत असताना जी पाच मंडळे आपणांस पार करावी लागतात, त्या पाच मंडळांची नावे ते शब्द आहेत. शब्दावर आरूढ होऊनच आपला आत्मा, एक–एक करीत ती मंडळे पार करू शकतो.

मी सांगत असतो की, परमात्मा समुद्र असून शब्द त्या समुद्रातील लाट आहे व आत्मा त्यामधील थेंब आहे. समुद्रही पाणी आहे, लाटही पाणी आहे व थेंबही पाणीच आहे. त्यांच्यामध्ये काही फरक असेल, तर एकमेकांपासून असलेल्या दुराव्याचा. थेंब जेव्हा लाटेत मिसळतो ती लाट त्यास समुद्रात नेते व समुद्राच्या पाण्यामध्ये मिसळून टाकते. याचप्रमाणे जो आत्मा त्याच्या सतगुरूंना अंतर्यामध्ये प्रगट करून घेतो, तो आत्मा सतगुरूंशी बोलू शकतो. सतगुरू त्यास पुढे कोठे नेतात? ते त्या आत्म्यास सचखंडामध्ये नेतात, जेथून तो या जगात आलेला असतो.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''तुम्ही सर्व बाजूंनी तुमचे लक्ष दूर सारून त्यास नामस्मरणाशी जोडा. त्यामुळे तुमचे लक्ष आपोआपच सतगुरूंशी जोडले जाईल. तुमचे जेवढे अधिक प्रेम सतगुरूंवर असेल, तेवढी अधिक तुमची प्रगती होईल. प्रेम केल्याशिवाय शिष्य प्रगती करू शकत नाही. सतगुरू आपल्या प्रेमाचे भुकेलेले नाहीत, त्यांना आपल्या प्रेमाची गरजही नसते. ते स्वत:च त्यांच्या सतगुरूंच्या प्रेमामध्ये गुंतलेले असतात. ते त्यांच्या सतगुरूंची आठवण प्रत्येक श्वासासोबत काढत असतात.''

आपण सातत्याने नामस्मरण करावयास हवे. नामस्मरण करताना आपल्या मनात सांसारिक विचार येता कामा नये. त्यावेळी फक्त आपण आणि आपले सतगुरूच असावयास हवेत. नामस्मरण अशा रितीने करावे की नामस्मरण करताना आपले लक्ष तिसऱ्या तिळावर एकाग्र रहावे. ही आपल्या पारमार्थिक प्रवासाची सुरुवात आहे, ते अंतर्यात जाणारे गृहद्वार आहे. मनास तिसऱ्या



तिळावर एकाग्र करावे. तिसरा तिळ आपल्या दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी थोडा वरील बाजूस आहे. त्यांमध्ये मामुली अंतर आहे, आपणांस येथून उठून आपल्या मेंदूमध्ये दाखल होणे गरजेचे आहे. आपले रक्षण करणारा परिपूर्ण परमात्मा, कोठे बाहेर नसून आपल्या मेंदूमध्ये बसून आपली प्रतिक्षा करीत आहे.

आपणांस संत प्रेमाने सांगतात की, आपण सातत्याने नामस्मरण करावयास हवे. नामस्मरण करीत असताना, आपले लक्ष बाहेर भरकटवू न देता, त्यास तिसऱ्या तिळावर एकाग्र करावे. मनास शांत ठेवण्याचा भावार्थ असा आहे की, आपल्या अंतरामध्ये जगाचे विचार येऊ देऊ नका. येथे आपण घरा–दाराचे काम–धाम सोडून आलेला आहात, त्यांची आठवण येथे करून काहीच उपयोग नाही. तुम्ही घरी गेल्यावरच ती कामे होऊ शकणार आहेत. ज्या कामासाठी आपण येथे आलेलो आहोत तेच काम लक्षात ठेवा. नामस्मरण करा, जेणेकरून मिळालेल्या या वेळेचा पुरेपूर फायदा तुम्ही करून घेऊ शकाल. बंधूनो! नामस्मरण करा.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
दिल्ली तसेच अहमदाबाद शहरातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती



परमसंत अजायबसिंहजी महाराजजींच्या कृपेने दिल्ली येथे १९, २० व २१ मे २०१७ रोजी निम्नलिखित पत्त्यावर सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. सर्व प्रेमींना विनंती आहे की, सत्संगास येऊन संतवचनांचा लाभ घ्यावा.

कम्युनिटी हॉल

भेरा एन्क्लेव्ह, पश्चिम विहार (पीरागढ़ी चौकीजवळ) नवी दिल्ली – ८७
फोन : ९८१०२१२१३८, ९८१०७९४५९७, ९८१८२०१९९९

अहमदाबाद येथे ७, ८, ९ जुलै २०१७ रोजी निम्नलिखित पत्त्यावर सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

श्री देशी लोहाणा विद्यार्थी भवन,

फुटबॉल ग्राऊंडसमोर (कांकरिया तलावाजवळ) अहमदाबाद ३८०००८
फोन: ९७२५००५७९४, ९६३८७५२०२०, ९८९८४६५३६९